स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समितीची पुनर्रचना

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक पीओअेस १२८३-११६५-विकर-स्वासै,
मंत्रालय, मुंबई-४०००३२, दिनांक :२० ऑगस्ट १९८५.

पहा : १] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक पीओअेस १२८१/११६५/एससी/दोन/एफएफ, दिनांक २४ सप्टेंबर १९८१.

२] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक पीओअेस १२८१/११६५/एफएफ एससी-दोन, दिनांक १९.११.१९८१.

३] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक पीओअेस १२८१/११६५/एससी-दोन एफएफ, दिनांक ८ जानेवारी १९८२.

४] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक पीओअेस १२८१/११६५/विकर/स्वासै, दिनांक १९ जुलै १९८२.

५] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक पीओअेस १२८३/११६५/विकर/स्वासै, दिनांक ११/१५ एप्रिल १९८३.

शासन निर्णय :- स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समितीची पुनर्रचना शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक पीओअेस १२८३/११६५/विकर/स्वासै, दिनांक ११/१५ एप्रिल १९८३ अन्वये करण्यात आली होती. ती आता रद्द करून खालीलप्रमाणे पुनर्रचना करण्यात येत आहे.

१] मुख्यमंत्री — अध्यक्ष.
२] श्री. भगवंतराव गायकवाड, वि.स.स — सदस्य.
३] श्री. गोविंदभाई श्रॉफ, औरंगाबाद — सदस्य.
४] श्री. नानासाहेब पुरोहित, महाड — सदस्य.
५] श्री. धुळाप्पा अण्णा नवले, सांगली — सदस्य सचिव.

२. या उच्चाधिकार समितीचे विचारार्थ विषय खालीलप्रमाणे आहेत :-

अ] स्वातंत्र्य सैनिकांचे निवृत्ती वेतन व आर्थिक सहाय्य संबंधीचे आतापर्यंत निकालात न काढलेले तसेच नवीन अर्ज निकाली काढणे,

ब] सरकारी यंत्रणेच्या सहाय्याने अशा अर्जाबाबत चौकशी करणे,

क] शासनाने विहित केलेल्या सवलतींच्याबाबत ज्या प्रकरणामध्ये जिल्हाधिकारी शासनाकडे स्पष्टीकरणाबाबत आदेश मागतात अशा संदर्भावर खुलासा करणे.

ड] भारत सरकारने जाहीर केलेल्या योजनेनुसार स्वातंत्र्य सैनिकांकडून आलेले अर्ज तपासून त्या अर्जासंबंधी केंद्र शासनाकडे पेन्शन मंजुरीसाठी शिफारस करणे.

इ] हुतात्मा स्मारक संबंधीचे प्रश्न निकाली काढणे.

क.मा.पृ...

३. या समितीच्या शासकीय, अशासकीय सदस्यांना नेहमीच्या नियमानुसार प्रवासभत्ता व दैनिक भत्ता देण्यात यावा [या शासन निर्णया सोबतचे जोडपत्र पहा].

४. शासनाचे अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, [रोख शाखा] यांना समितीच्या अशासकीय सदस्यांच्या प्रवासभत्त्यांच्या बिलासंबंधी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे. आणि उप सचिव, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांना त्या बिलांवर प्रतिस्वाक्षरी करण्यात प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. या प्रस्तावावरील खर्च "२५२-सेक्रेटरीएट व इतर सर्वसाधारण सेवा [२] सचिवालय- मागणी क्रमांक ७ या अर्थसंकल्पीय शीर्षाच्या खर्च खाली टाकण्यात यावा व त्याखाली मंजूर केलेल्या अनुदानातून तो भागविण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

दा प कांबळे

[ दा. प. कांबळे]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
श्री. भगवंतराव गायकवाड, वि.स.स.
श्री. गोविंदभाई श्रॉफ, अध्यक्ष, मराठवाडा जनता विकास परिषद, इ.बी.ई. सोसायटी कॅम्पस औरंगाबाद,
श्री. नानासाहेब पुरोहित, महाड, जि. रायगड,
श्री. धुळप्पा अण्णा नवले, सदस्य सचिव, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती, ६ वा मजला, मंत्रालय, मुंबई,
सर्व मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
महालेखाकार, [ लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र १, मुंबई,
महालेखाकार, [ लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र २, नागपूर,
महालेखाकार [ लेखा परीक्षा] महाराष्ट्र, मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभाग,
संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.